नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 23/08/2021 (सोमवार)
(सकाळ)

---

## चोरी

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावरील पिपळा डाग बंगला येथे दिनांक 21/08/2021 चे 22:00 वा. ते दिनांक 22/08/2021 चे 10:00 वा. सुमारास फिर्यादी नामे–निलेश बाबुराव लोखंडे, वय 31 वर्ष, रा. पिपळा डाग बंगला याने त्याचे राहते घराचे कंपाउडमध्ये वाहन पार्किंग मध्ये एमएच– 49/एम– 6512 क्रमांकाची मोटरसायकल उभी करून ठेवली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची कि. 20,000/–रू. मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार डोंगरे हे करीत आहे.

2) पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 13 कि. मी. अंतरावरील गोठनगाव पुनर्वसन ता. कुही येथे दिनांक 21/08/2021 चे 20:30 वा. ते दिनांक 22/08/2021 चे 06:30 वा. सुमारास फिर्यादी नामे– प्रदीप श्रावणजी देव्हारे, वय 38 वर्ष, रा. गोठनगाव पुनर्वसन ता.कुही हे आपल्या किराणा दुकानाच्या लोखंडी शटरला कुलुप लावुन दुकान बंद करुन घरी गेले होते. दुस–या दिवशी सकाळी दुकान उघडण्याकरीता आले असता दुकानाच्या शटरला लावलेले कुलुप दिसुन आले नाही. फिर्यादीने दुकानाच्या आत जावुन पाहीले असता पैशाचे ड्रावरमधुन नोटा व नानी असे एकुण अंदाजे 12,000/–रु. चा माल दिसून आले नाही. पो.स्टे. वेलतुर येथील स्टाफने तपासादरम्यान आरापी नामे– 1) जितेंद्र गोपाळा ठाकरे वय 23 वर्ष, 2) लोकेश पुरुषोत्तम काकडे, वय 32 वर्ष, दोन्ही रा. करांडला ता. कुही, जि. नागपुर यांना फिर्यादीचे दुकानातील नगदी 12,000/–रू. चोरून नेल्याचे निष्पन्न झाल्याने अटक करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 461, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदा संजय पायक मो.क्र. 8830923310 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 8 कि. मी. अंतरावरील खंडाळा शिवार येथे दिनांक 21/08/2021 चे 19:00 वा. दरम्यान फिर्यादीचे वडील नामे– प्रदीप मुकुंदराव मेंढे, वय 61 वर्ष, रा. मानकापुर नागपुर हे त्यांचे एमएच– 31/ईझेड– 4541 क्रमांकाची बुलेट मोटरसायकलनी स्वतः चालवित धुरखेडा बोरगाव शिवार शेतातुन खंडाळा मार्ग मानकापुर नागपुर येथे त्यांच्या डाव्या साईडने बुलेट स्वता चालवित येत असता विरूदध दिशेने भरतवाडा कडुन खंडाळा कडे जाणारी एमपी– 48/ एमव्ही– 4207 क्रमांकाची डिस्कव्हर मोटरसायकलच्या चालकाने त्याच्या वाहनात एका ईसमास डबल सिट बसवुन वाहन वेगात व लापरवाहीने चालवुन रॉग साईड येवुन फिर्यादीचे वडीलाचे बुलेट ला समोरून धडक दिली. या अपघातात फिर्यादीचे वडील गंभीर जखमी झाले त्यांना उपचाराकरीता

मेयो हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. तसेच आरोपी व सोबतचा इसम जखमी झाल्याने व दोन्ही वाहनाचे नुकसान झाले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मनिष प्रदीप मेंढे, वय 28 वर्ष, रा. प्लॉट नं 4 नागसेन सोसायटी कोराडी रोड मानकापुर नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. 119/177, 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार मोरेश्वर नागपुरे मो.नं. 8888821360 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर